टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे या संस्थेच्या डिपार्टमेंट ऑफ फिजीयोथेरपी, पुणे या महाविद्यालयाचे नाव बदलण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एनयुआर-२०२२/प्र.क्र.१२८/२२/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
दिनांक : ३० मे, २०२२.

वाचा :- शासन निर्णय क्र. पीएसओ-२०१० /प्र.क्र.१९६/१०/शिक्षण-१, दि.३०.०५.२०१२.

**प्रस्तावना :-**

टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे या संस्थेच्या नवीन भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. डिपार्टमेंट ऑफ फिजीयोथेरपी, पुणे हे महाविद्यालय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ या संस्थेच्या अंतर्गत होते. संस्थेने सदर महाविद्यालयाच्या नावामध्ये "टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठामधील डिपार्टमेंट ऑफ फिजीयोथेरपी,पुणे ऐवजी बदलून 'टिमव्हि'ज् जयंतराव टिळक कॉलेज ऑफ फिजीओथेरपी' (इंग्रजीमध्ये) व टिमविचे जयंतराव टिळक भौतिकोपचार महाविद्यालय' (मराठीमध्ये) असे नाव करावे अशी विनंती केली होती. त्यानुसार संस्थेच्या नावात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठामधील डिपार्टमेंट ऑफ फिजीयोथेरपी,पुणे भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे नाव **"टिमव्हि'ज् जयंतराव टिळक कॉलेज ऑफ फिजीओथेरपी' (इंग्रजीमध्ये) व टिमविचे जयंतराव टिळक भौतिकोपचार महाविद्यालय' (मराठीमध्ये)"** असे करण्यास खालील अटीच्या अधीन शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या तसेच महाविद्यालयाच्या प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

२) संस्थेच्या रुग्णालयातील रुग्णांच्या व रुग्णालय प्रशासनाच्या हितास कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही.

३) संस्थेच्या स्थावर जंगम मालमत्तेस तसेच इतर मिळकतीवर कोणत्याही प्रकारची गदा येणार नाही.

४) संस्थेच्या महाविद्यालयाच्या नावात वरीलप्रमाणे बदल केल्यामुळे या संदर्भात भविष्यात कोणतीही कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुरेंद्र प्र. चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वै.शि.), यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
८. सचिव, प्रवेश नियामक अधिकारी, ८ व ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डिंग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१.
९. सचिव, शुल्क नियामक अधिकारी, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ३०५, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
१०.प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
११.प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.
१२.सचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यापीठ भवन, मुकुंद नगर, गुलटेकडी, पुणे-४११०३७.
१३.अवर सचिव, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई
१४.निवडनस्ती (शिक्षण-१).